[श्री दत्तावतार]

# श्री वासुदेवानंद सरस्वती

## (टेंबे स्वामी)

# चरितामृत

**वासुदेवानंद सरस्वती - (श. १७७६-१८३६)**

यांचा जन्म सावंतवाडी संस्थानातील (सिंधुदूर्ग) माणगांव खेड्यात श्रावण व. ५, शके १७७६ या दिवशी झाला. वडिलांचे नाव गणेशभट्ट टेंबे आणि आईचे नाव रमाबाई. गणेशभट्ट हे अग्निहोत्री कऱ्हाडे ब्राह्मण. वासुदेवानंदांचे मूळ नाव वासुदेव. त्यांचे संस्कृत शिक्षण पितामह हरिभट्ट यांच्याकडे झाले. एकविसाव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. मंत्रसिद्धी, ज्योतिष, आणि वैराग्यशीलता यामुळे साधुत्वाचे वलय त्यांचे भोवती सतत असे. वयाच्या २७ व्या वर्षी ते नरसोबावाडीस आले. गोविंदस्वामी नामक महात्म्यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. दत्तगुरुनींच त्यांना एका अवधुताच्या रुपाने मध्यरात्रीच्या वेळी कृष्णातीरी मंत्रोपदेश दिला. ते स्वयंपाक करुन एकटे राहत. मौनव्रत पाळीत. शके १८१३ मध्ये गंगाखेड येथे पत्नीचे देहावसान झाले. पत्नी गेल्यावर तेराव्या दिवशी त्यांनी संन्यास दीक्षा स्विकारली. नंतर अखिल भारतात त्यांनी पायी प्रवास केला. माणगांव, वाडी, ब्रह्मावर्त व गरुडेश्वर या चार ठिकाणी त्यांचा जीवनाचा मोठा भाग व्यतीत झाला.

वासुदेवानंद सरस्वतींची ग्रंथरचना विपूल आहे. गुरुसंहिता, दत्तपुराण, शिक्षात्रय, सप्तशती, गुरुचरित्र, माघ महात्म्य, स्त्रीशिक्षा (संस्कृत) इत्यादि ग्रंथ आणि शेकडो संस्कृत व मराठी स्तोत्रे येवढा त्यांच्या रचनेचा व्याप आहे. चार पाच हजार पृष्ठांचा हा ग्रंथसंभार स्वामींच्या देशभक्तीचे धर्मनिष्ठेचे, प्रगाढ चिंतनशिलतेचे आणि लोकोद्धाराच्या तळमळीचे प्रतीक आहे. दत्तावतार वासुदेवानंद सरस्वती म्हणूनच ते प्रख्यात आहेत.

# श्री. प. प. वासुदेवानंद सरस्वती
# टेंबे स्वामी महाराज

---

श्रीराम देती प्रेरणा
तेणेंचि होई ही रचना
सद्‌गुरु प्रभु निमित्त माना
कार्य महाराजांचे

-श्रीसद्‌गुरु प्रभु.

श्री गणेशाय नमः ।।　　श्री सरस्वत्यै नमः ।।

श्री गुरुभ्यो नमः ।।　　श्री सीतारामचंद्राय नमः ।।

श्री गुरु दत्तात्रेयः प्रसन्नोस्तु ।।

## ।। श्री दत्त ।।

महाराष्ट्रीं कोकण क्षेत्री । सह्यगिरी जलपात्री । माणगांवी पुत्र अत्रीं । तेजोरूपे प्रकाशती ।।१।। टेंबेकुळीं गणेशभट । लौकिकाचा त्यांना वीट । गाणगापुरीची सात्विक वाट । धरती दृष्टांत होओनी ।। २ ।। दत्तचिंतनीं प्रवृत्ती । द्वादश वर्षे तेथं राहती भागवतोत्तम त्यांची ख्याती । दत्तप्रसाद मिळाल्यानें ।। ३ । शके सतराशे शहात्तरीं । श्रावण आनंद संवत्सरीं । कृष्ण पंचमी रविवारीं । जन्मा आले वासुदेव ।। ४ ।। सूर्योदय झाल्या उपरी । सव्वीस घटिकानंतरी । भगवत्‌भक्त दत्तावतारी । जन्मा आले माणगावीं ।। ५ ।। धन्य माता रमाबाई । पुण्यकर्मी गढून जाई । सर्व सत्कर्म होई । विविध व्रतें करीतसे ।। ६ ।। लक्षवाती

औदुंबर प्रदक्षिणा । भोजन देई अतिथींना । करी गुरुचरित्र वाचना ॥ यक्षिणी पूजा नित्य असे ॥ ७ ॥ वासुदेव असती प्रसन्न । करिती धर्माध्ययन । आठव्या वर्षी उपनयन । मार्गदर्शन हरिभट्टांचे ॥ ८ ॥ उषःकालीं संध्यावंदन । नित्य गुरुचरित्र वाचन । तैसेच वेद अध्ययन । सुरू झालें बालपणीं ॥ ९ ॥ प्रज्ञाशक्ती असे तीव्र । मंत्रशक्ती प्रसन्न सर्व । अैसें असोनि मुक्तगर्व । होती अध्ययनें वेदांच्या ॥ १० ॥ स्वतः शिजविती भोजन । नैवेद्य वैश्वदेव करोन । परान्नाला न शिवोन । व्रतस्थ राहती वासुदेव ॥ ११ ॥ वाद टाळती मौनानें । जीवन जगले सत्कर्मानें । नेम पाळिती निर्धारानें । महानिर्वाण होई तों ॥ १२ ॥ एक पंचा नेसण्यासी । दुसरा तो पांघरण्यासी । त्रिकाल स्नान घेण्यासी । वस्त्र नसेची याविना ॥ १३ ॥ दृष्टांत झाला जाण्याचा । गोविंद स्वामी भेटण्यांचा । निर्धार झाला बुवांचा । नृसिहवाडीस पोंचले ॥ १४ ॥ भेटती गोविंद स्वामींना । मग कृष्णाजल अर्पिती पादुकांना । भावबळें जाणती स्वामींना । गुरु आपुले निश्चित ॥ १५ ॥ वासुदेवा बोलती दत्तगुरु । सात वर्षे संचार करूं । माणगांवी येती दत्तगुरु । वासुदेवासह

मूर्तिरुपें ।। १६ ।। मूर्ती होती कागलची । सात बोटें उंचीची । 'वरा भयकर' द्विभुजांची । सिद्धासन घातलेली ।। १७ ।। वासुदेवा देव बोलती । पुजा विधी त्यांना सांगती । त्यानुसार बुवा वागती । सुचनेनुसार देवांच्या ।। १८ ।। ढीग ढीग नारळ केळीं । विविध फळें वेळोवेळीं । भक्तजन दर्शन काळीं । मूर्तीपुढे ठेवितो ।। १९ ।। अभिलाषा नाहीं वासुदेवा । मूर्तिमंत असे वैराग्य ठेवा । अैसा दत्तभक्त प्रकट व्हावा । भाग्य तेथील लोकांचे ।। २० ।। देवांची झाली सूचना । लिहिण्या गुरु-चरित्र रचना । देव सांगती बुवांना । " संहितेयं द्विसाहस्त्री " ।। २१ ।। 'रचना झाली देवें केली । दिसलीं अक्षरें फक्त लिहिलीं"। बुवानी उत्तरें दिधलीं । नारोपंत उकोडव्यां ।। २२ ।। येती सुखदुःखें प्रारब्धाने भोगावीं तीं मुकाटयानें । प्रारब्धभोग भोगण्यानें । आपोआपच संपतो ।। २३ ।। माणगांवीं जल देवीला । नांव ठेविती निर्मला । सांगती भक्तजना नदीला । 'निर्मला' संबोधावें ।।२४।। देवा नावडे न्यूनता । अन्न शुद्धीविना नैवेद्य देतां । वासुदेवा प्रेरणा मिळतां । 'तूप' त्यांना आठवे ।। २५ ।। पत्नीमृत्यु नंतरी । तेरा दिन

झाल्यावरी । गृहस्थाश्रम संपल्यावरी । संन्यासाश्रमा स्विकारिलें ।। २६ ।। गोविंदस्वामी स्वप्नीं आले । ‘ प्रणव ’ उपदेश करते झाले । जप करण्या सांगितलें । गोविंद रूपें दत्तांनीं ।। २७ ।। वासुदेव येती उज्जनीस । अनिरुध्दानंद सरस्वती खास । देवविनी विधियुक्त दंड त्यांस । हस्तें नारायणानंदांच्या ।।२८।। पायी प्रवास करावा । दत्ताज्ञा होई वासुदेवा । अनवाणी प्रवास व्हावा । इच्छा असे श्रीगुरूंची ।। २९ ।। चार लंगोटचा छाटचा दोन । एक दंड कमंडलु सान । दोन मूर्ती संपुष्ट पंचायतन । प्रपंच फक्त एवढा... ।। ३० ।। एक मूर्ती प्रवासाची । दुसरी ती कागलची । नर्मदा तीरीं वढवाईस तिची । स्थापना झाली म्हणताती ।। ३१ ।। जालवर्णीं येती महाराज । वेद अध्यापन होई रोज । दिनीं दासनवमी । सहज । वाचती दास बोधातें ।। ३२ ।। दासबोध ग्रंथ प्राकृत । कीं असे तो संस्कृत । बाह्यांगांत नसे अर्थ । अर्थानुसंधान ठेवावे ।। ३३ ।। आचार लुप्त कलीयुगीं । केवळ वेदपठण न उपयोगी । प्राकृत ग्रंथही उपयोगी । संत सत्पुरुषांचे ।। ३४।। आस्तिकांनी नास्तिकांनी । अनुभव घेतला जालवर्णीं । प्राकृत भाषा निंदा त्यांनीं । प्रचिती घेओनी

थांबविली ।। ३५ ।। दीड वर्ष ब्रह्मावर्ती । योग, यांज्ञिक, वेदांत शिकविती । ' दत्त पुराण ' ग्रंथ लिहिती । पवित्र गंगा किनारीं ।। ३६ ।। हरिद्वारीं येती नंतरी । मथुरा वृंदावन पाहिल्यावरी । चातुर्मास झाल्यावरी । बद्रिनारायणा निघाले ।। ३७ ।। हिमालयीं वर्षे दोन । अज्ञातवासीं राहोन । यात्रा तेथली आटोपून । हरिद्वारीं परतले ।। ३८ ।। चातुर्मास तेथ करिती । ब्रह्मावर्ता पोचती । राममंदिरीं राहती । सन्मार्ग दाविती अनेकां ।। ३९ ।। महाराज येती द्वारकेंत । चातुर्मास होई तेथ । वसती होती शारदामठांत । श्री शंकराचार्यांच्या ।। ४० ।। स्वीकार करावा गादीचा । आग्रह झाला ग्रामस्थांचा । परि त्यांच्या विनंतीचा । विचार नाहीं जाहला ।। ४१ ।। द्विसाहस्री ' गुरु चरित्राची । ग्रंथ नसतां टीका त्याची । श्लोक स्मरणशक्तीची । मदत झाली लिहावया ।। ४२ ।। गुरुस्वामी आजारी । उज्जनीस जावें सत्वरी । तेथे व्हावें सेवेकरी । आज्ञा केली देवांनीं ।। ४३ ।। इंदूर मार्गे उज्जनीस । महाराज गेले सेवेस । तेथोन निघती महत्पुरास । आज्ञा घेती गुरुस्वामींची ।। ४४ ।। दत्तमहात्म्य ' रसाळ ग्रंथ । लिहून होई पूर्ण तेथ । त्रिशती गुरुचरित्र,

काव्यग्रंथ । स्वामी लिहिती तेथेंची ॥ ४५ ॥ औषधें सांगतो रोग्यांसाठी । यंत्रें देती बाधेसाठीं । अनुष्ठान ध्यान प्राप्तीसाठीं । लोकां प्रचिती मिळाली ॥ ४६ ॥ शके अठराशें चोव्वीस । होई बारावा चातुर्मास । कीर्तन पुराण शिष्यांस । शिकविती आणि करविती ॥ ४७ ॥ निर्गुणोपासना अहंकार । पंडितास एक होता फार । सन्यासाश्रमीं मूर्तिपूजा आधार । महाराजां ते विचारिती ॥ ४८ महाराज होते संन्यासी । दत्तमूर्ती सोडिना त्यांसी । मूर्तीपूजा उपचारासी । त्यांना लागे करावा ॥ ९ ॥ त्या पंडिताबरोबरी । महाराज पोचती गंगातिरीं । सोडिती मूर्ती, प्रवाही तरी । गंगा किनारी खडी असे ॥ ५० ॥ अंगुष्ट प्रमाण दत्तमूर्ती । पाहती पंडित प्रचिती घेती । सगुणोपासना सुरू करिती । शिष्य होती महाराजांचे ॥ ५१ समश्लोकी गुरुचरित्र । लिहिती स्वामी दिवसरात्र । दत्तआज्ञेस पूर्ण पात्र । ग्रंथलेखन जाहलें ॥ ५२ ॥ ग्रंथ लिहिती वेदान्तावर । नांव त्याचें 'लघुमननसार'। लेखन वाढे उत्तरोत्तर । ब्रह्मा वर्त नगरीं ॥ ५३ ॥ 'गुरुचरित्र सप्तशती'। महाराज तेथे पूर्ण करिती । 'गुरु चरित्र कथासार' लिहिती । होई

रसाळ ग्रंथ तो ।। ५४ ।। भाषा सोपी असे मधूर । प्रत्येक ओवी तिसरें अक्षर । अध्याय पंधरा तयार । होतसे भगवत् गीतेचा ।। ५५ ।। काल्पी जालवणी, झाशी । पिछोरा, रावेर, भेलसी । हुशंगाहुनी नृसिंह्वाडीसी । येओन स्वामी पोचती ।। ५६ ।। पुजाऱ्यां सांगती श्री सेवा । स्मरा मनानें गुरु भावा । 'करुणापदी ' प्रार्थना आळवा । क्लेशमुक्त होण्यालागी ।।५७।। दीक्षित स्वामी दंड घेतो । ते होती नरसिंह सरस्वती । एकनिष्ठ भक्त असती । महाराजांचे ।। ५८ ।। महाराज करिती श्री सेवा । तेथोन जाती शिरोळगांवा । अक्कलकोटी योग यावा । स्वामी दर्शन दत्तइच्छें ।।५९।। दत्तप्रेरणा झाल्यावरी । अेकावन्न श्लोकी ' कृष्णा लहरी '। महाराज रचिती गाणगापुरीं । कृष्णामाई आज्ञेने ।। ६० ।। कारंजपुर माहुरक्षेत्र । पायी चालती सर्वत्र । नरसी गांवी दिनरात्र । होई 'गुरुदेव ' घोषणा ।। ६१ ।। राम मंदिरीं राहती । 'दत्तचंपुकाव्य ' लिहिती । अनेकां रोग मुक्त करिती । नरसी गांवी ।। ६२ ।। तीर्थ क्षेत्रे अनेक फिरती । नवीन क्षेत्रे निर्माण होती । ब्रह्मावर्ती पुन्हा पोचती । चौथी खेप त्यांची असे ।। ६३ ।। काशी जाण्या आज्ञा झाली । चैत्र शुद्ध

अष्टमी आली । काशीत चाहुल लागली । महाराज आगमने ।। ६४ ।। श्री स्वयंप्रकाश काशीचे । अैशीं वर्षे वय हो त्यांचे । चाळीस चातुर्मासांचे । पुण्य कार्य पदरीं असे ।। ६५ ।। साष्टांग नमस्कार घातला । मनःपूर्वक प्रणिपात केला । महाराजांचा गौरव केला । स्वयंप्रकाश स्वामीनीं ।।६६।। तेथोन जाती प्रयागीं । चातुर्मास करण्यालागीं । 'नृसिंहवाडी लागा मार्गी' । देव त्यांना बोलले ।। ६७ ।। श्री वासुदेवानंदसरस्वती । देव सूचनेनुसार वागती । द्वैत अद्वैत ज्ञान महती । ज्ञात असोनीं पूर्णत्वें ।। ६८ ।। नृसिंहवाडीस ते येती । पादुकांपुढे उभे राहती । जनता लोटे दर्शनाप्रती । महाराजांच्या ।। ६९ ।। मठ ब्रह्मानंदाचा । निवास होता तेथे त्यांचा । भाविक लोकां दर्शनाचा । अलभ्य लाभ पुनः पुनः ।। ७० ।। पहाटे होई, प्रभुस्मरण । मग स्नान नित्यानुष्ठान । आणि गुरुपादुका वंदन क्रमाने करिती ।। ७१ ।। नारायणस्वामींची पूजा होई । उपनिषद गीताभाष्य काही । पांच गृहीं भिक्षा होई । लेखन नंतर होत असे ।। ७२ ।। मंत्र जप देण्याचें । संकट निवारण लोकांचें । काम शंका निरसनाचे । चाले सायंकाळ पावेतो ।। ७३ ।।

संगमीं ते मग जाती । संध्या वंदन तेथे करती । 'कृष्णालहरी' सांगती । प्रेम भरते येई तों ॥ ७४ ॥ श्री शेजारती झाल्यावरी । महाराज बसती कट्ट्यावरी । अभंग पदे भजनोत्तरीं । होई वाहणें पुष्पांजली ॥ ७५ ॥ शिष्य नरसिंहसरस्वती । लाकडी पादुका पुढे करिती । महाराज त्या घालोनि देती । नरसिंह सरस्वती शिष्यासी ॥ ७६ ॥ वाडी पैल तिरीं औरवाड । अमरेश्वरीं पादुका जोड दर्शन होई अजोड । भक्तां तेथे आजही ॥ ७७ ॥ महाराजा ये भाव समाधी । आणि देवांसोबत बोलण्या संधी । "रामेश्वरा चला आधीं" । देव त्यांना सांगती ॥ ७८ ॥ महाराज निघती रामेश्वरा । तेरवाड, मुक्तेश्वर मंदिरा । मलीकवाडी, वेदगंगातीरा । कुरुंदवाडराजें बरोबरी ॥ ७९ ॥ स्वामी महाराज, जेथे जाती । होई देव नदीची स्तुती । स्तोत्रें 'स्तोत्र संग्रहीं मिळती । भाविकां करितां ॥ ८० ॥ हिरण्यकेशी नदी तीरा । महाराज येती संकेश्वरा । नंतर पोचती शृंगापुरा । पुढे पोचती केंगेरीं ॥ ८१ ॥ क्षेत्र चिदंबर तेथें असोन । मल्हार दिक्षितां पुत्र महान । शंकर अवतार जन्मापासोन । बिल्वदळ अक्षता कानावरी ॥ ८२ ॥ सत्पुरुष चिदंबर

दिक्षित । लोक सहस्त्र घरीं जेंवित । खर्चा पैसा तांब्यांतून देत । यज्ञ करिती मोठमोठे ॥ ८३ ॥ प्राकृत संस्कृत स्तोत्र लिहिलें । चिदंबर स्तोत्र पूर्ण झालें । तुंगभद्रा तिरीं आले । विद्यारण्य मठामाजी ॥ ८४ ॥ स्नान दर्शन स्तुती करोन । शेषाचल पर्वतीं येओन । कार्तिक स्वामी दर्शन घेओन । रामेश्वरीं पोचती ॥ ८५ ॥ तेथोन जाती तंजावरीं । जेथ वेणु कावेरी । चातुर्मास तंजावरी । करिती श्री महाराज ॥ ८६ ॥ देव लिहिण्या सांगती : चुर्णीका शब्द अैकती । ते गोषवारा लिहिती । मूळ गुरु संहितेचा ॥ ८७ ॥ श्रीरंग मुक्कामीं शंकराचार्य । महाराजांचें वर्णिती कार्य । धर्मसंस्थापनार्थाय । दत्तावतार ते असती ॥ ८८ ॥ शके अठराशें तीस । मुक्तीश्वरपूर मुक्त्यास । अठरावा चातुर्मास । व्यासपूजा होतसे ॥ ८९ ॥ ते लिहिती 'युव शिक्षा' । 'वृध्द शिक्षा' 'स्त्री शिक्षा' । फिरत फिरत नागेशा । वद्य आश्विनीं पोंचती ॥ ९० ॥ पुढे संचार तिरीं । मग तेथोन राजमहिंद्रीं । आणि येती पिठापुरीं । जन्मगांवीं श्रीपाद वल्लभांच्या ॥ ९१ ॥ शंकराचार्य शृंगेरीचे । ते अभिमानी महाराजांचे । 'मंत्रगर्भ' स्तोत्र स्वामींचे । वाचिती ते

आनंदें ॥ ९२ ॥ राजमहेंद्रीं ब्रह्मानंद सरस्वती । महाराजहस्तें स्थापिती । त्रिमुखी दत्तात्रेय मूर्ति । पादुकांसहित ॥ ९३ ॥ वाटेमाजी प्रवासांत । एका घरीं भिक्षे येत । आंबील आणि भाकर भात । घेओन भक्तीण उभी असे ॥ ९४ ॥ भाकर भात पुरे म्हणती । काकुळतीस बाई येती । आंबील घेण्या विनवीती । स्वीकार केला भक्तीचा ॥ ९५ ॥ अणावकर सावंतवाडीचे । उत्तम परिचित पूर्वाश्रमीचे । नृसिंहवाडीस महाराजांचे । दर्शना येती ॥ ९६ ॥ 'बहुत दिसांनी आपण । माझी केली आठवण । यास्तव माझें आगमन' समंध बोलूं लागला ॥ ९७ ॥ 'शंकराच्या पिशाच गणावरी । मी असे मोठा अधिकारी । परि श्री दत्त येती जातो दुरी'। समंध गेला निघोन ॥ ९८ ॥ धुंडीराज कवीश्वर । असती स्वामीभक्त थोर । वैराग्या होते अधीर । स्वामी त्यांना आवरती ॥ ९९ ॥ प्रपंचीं राहून परमार्थ साधा । कविश्वर बुवा आचरतो बोधा । पुराण कथुनि धर्मश्रद्धा । भाविकांमाजी वाढविती ॥ १०० ॥ शके अठराशें बत्तीस । केला विसावा चातुर्मास । तुंगभद्रातीरीं हावनुरास । भेटती श्री गुळवणी ॥ १०१ ॥ कुरगुड्डी स्थानीं स्वामी येती । श्रीपाद श्रीवल्लभ

सुचविती । त्यानुसार चातुर्मास करिती । कृष्णा प्रवाहीं बेटावर ॥१०२॥ कुरगुड्डी म्हणजे कुरवपूर । एका टोका दत्तमंदीर । गांव दुसऱ्या टोकावर । मध्ये असे शेतवाडी ॥ १०३ ॥ अठरा मैलावरी रायचूर । मिळे तेथे वस्तु व्यापार । चहुकडे पाणी फार । पर्जन्य सुरू झाल्यावरी ॥ १०४ ॥ चातुर्मास झाल्यानें । भक्त मंडळी आल्यानें । भविक ये–जा होण्याने । स्थळ महात्म्य वाढलें ॥ १०५ ॥ शिष्य महान गांडाबुवा । संन्यास घेती गुंजगांवा । त्यांच्या पादुका याच गांवा । असती मृत्यु नंतरी ॥ १०६ ॥ स्वामी जनार्दन दर्शन । दौलताबादी घेओन । तापी नदी स्नान करोन । येती खेडी गावाला ॥ १०७ ॥ चिखलदा जाण्या ते निघती । धर्मपुरीं वास्तव्य करिती । चिखलदा गांवी पोचती । पूर्ण होण्या चातुर्मास ॥१०८॥ उत्पन्न होण्या भक्ति खरी । भागवत, भक्ती विजय, ज्ञानेश्वरी । ईश्वर भक्ती निर्माण करी । खरोखरी मनांत ॥ १०९ ॥ जरी शुध्द नसे अंतःकरण । तरी फुकट असे अध्ययन । कर्ममार्गे शुध्द होवोन । खरे ज्ञान। प्रगटे ॥ ११० ॥ ऐसा उपदेश भाविकांस । करोनि लाविती सन्मार्गास । प्रचिती देण्या भक्तजनांस । क्षण न लागे महाराजां ॥ १११ ॥ तेवीसावा ।

चातुर्मास । नर्मदा किनारीं गरुडेश्वरास । नारदेश्वर मंदिरीं अनुष्ठानास । स्वामी जागा निवडती ।। ११२ ।। कृष्ण जयंती जवळ येतां । ते परिसर सफाई करूं लागतां । उत्सव साजरा होण्याकरितां । कामा लागती सारे जन ।। ११३ ।। कथा कीर्तन झाल्यावरी । भजन होई तदनंतरी । नर्मदा नदी पैलतिरीं । पर्जन्य वर्षाव होत असे ।। ११४ ।। स्थिर होण्यांस्तव मन । विहित धर्म आचरण । वेदान्त श्रवण मनन । निदिध्यासन असावें ।। ११५ ।। असो कोणताही धंदा । असावी अपुली स्वधर्मी श्रध्दा । स्वकर्मी दक्ष सर्वदा । शुध्द होई अंतःकरण ।। ११६ ।। अंतःकरण शुध्दीने । स्थिरता येई उपासने । मन होई शांत तेणें । आत्मज्ञान सत्वरी ।। ११७ ।। माता पिता सेवा । धर्म मुलांनी आचरावा । थोरांना मान द्यावा । ऐसें स्वामी बोलती ।। ११८ ।। शके अठराशें छत्तीस । असे तो वैशाख मास । बळ आले आजारास । स्वामी महाराजांच्या ।। ११९ ।।दत्त दत्त नाम घेती । इतरां म्हणावया सांगती । दीर्घ प्रणवोच्चार करती । निरोप घेण्या अखेरचा ।। १२० ।। आषाढ शुध्द प्रतिपदा । वार मंगळ नक्षत्र आर्द्रा । महाराज निर्वाणें नर्मदा ।

रडूं लागे ढसढसां ।। १२१ ।। पुरुष सुक्त रूद्रपवमान । मंत्राभिषेक होवोन । षोडषोपचार पुजा होवोन । देहा ठेंवियलें पुष्पासनीं ।। १२२ ।। बेल तुलशी फुलें माळा । भाविक अर्पिती त्यांच्या गळा । भक्तजन होती गोळा । नर्मदा तटीं पावन ।। १२३ ।। ब्रह्मस्वरुपीं महाराज । देखोनि नर्मदा गहिवरे आज । नर्मदा बने तीर्थराज । गरुडेश्वरीं आजही ।। १२४ ।। कारंजा, वाडी, गाणगापूर । कुरवपुर, औदुंबर, पिठापूर । साखळी, माणगांव, गरूडेश्वर । पवित्र अक्कलकोट तैसेची ।। १२५ ।। जैसे श्री वल्लभ यती । तैसे नरसिंह सरस्वती । अक्कलकोटीं समर्थ असतीं । तैसेच श्री वासुदेव ।। १२६ ।। यांच्या रुपें साक्षात् दत्त । सत्य धर्माचरणा प्रवृत्त । करिती भाविकां त्रिवार सत्य । सद्गुरु प्रभू सांगतसे ।। १२७ ।। श्री गुरुदेव दत्त प्रार्थून । एकदां तरी दिवसांतून । हें चरित्रासर वाचन । मनोभावें करावें ।। १२८ ।। दत्तदर्शना जे आतूर । त्यांना दर्शन होई सत्वर । भावें वाचा चरित्रसार । जैसें होई शक्य तुम्हा ।। १२९ ।। श्री वासुदेवानंद सरस्वती । दत्तावतार ते असती । तयां माझी विनंती । भक्तां करा भयमुक्त ।। १३० ।। गुरु महाराजां विनती । हें चरित्रसार

वाचिती । त्या सर्वांची इच्छापूर्ती । त्वरें आपण करावी ।। १३१ ।। जे जे जाती माणगांवीं । भेटा प्रथम यक्षिणीं देवी । शूलपाणी भेट घ्यावी । औदुंबरीं श्री दत्तगुरु ।। १३२ ।। मंदिरीं असती वासुदेव । मागें दिसती गुरुदेव । दोन्ही माना एकभाव । कोटी कल्याण होतसे ।। १३३ ।। आद्यग्रामींचे सर्व देव । रुद्र वेतोबा ग्राम देव । सिद्ध कुलदेवता सदैव । लेखना साह्य करिताती ।। १३४ ।। श्रीराम देती प्रेरणा । तेणेंचि होई ही रचना । सद्गुरु प्रभु निमित्त माना । कार्य महाराजांचें ।। १३५ ।। हें एकाध्यायी चरितामृत । तिथी सप्तमी फाल्गुनांत । अमृत योगीं पूर्ण होत । शके एकोणीसशें पाचांतरीं ।। १३६ ।।

इति श्रीराम प्रेरणया आजगांवकर इत्युपनामक सद्गुरु प्रभू विरचित "श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी चरितामृत" ओवी संख्या १३६

## –आमची प्रकाशने–

१) **वेदांत धर्म अँड सायन्स** (किंमत १० रुपये)

२) **भारतांतील शास्त्रांचा उद्गम् आणि विकास–**
लेखक– डॉ. पंढरीनाथ प्रभू (किंमत १५० रुपये सेट) (मराठी)

३) गंधर्वकालीन नटवर्य– **माधवराव वालावलकर**
(संपादक– गुं. फ. आजगांवकर, किंमत २५ रुपये)

४) **कृपेची साऊली माऊली माझी–**
लेखक– स. फ. आजगांवकर, (किंमत १० रुपये)

५) **ओवी नामामृत सार** (लेखक–सद्गुरु प्रभु) किं. १–५०

६) **सोऽहं ध्यानतरंग** (लेखक– सद्गुरु प्रभु) किं. २–००

---

**प्रकाशक–** प्रबोधन रिसर्च असोसिएट्स्
१७ के. जी. बी. निवास, गिरगांव– मुंबई ४०० ००४

संपादक–प्रकाशक :

**गुं. फ. आजगांवकर**

१७ के. जी. बी. निवास,

गिरगांव, मुंबई–४०० ००४.

**प्रथमावृत्ती – १६ ऑगस्ट १९८४**

मुद्रण–स्थळ :

**नरेश मुद्रणालय**

चेंढरे–अलिबाग

रायगड

**किमत २ रुपये**